# SUCCESS KEY TEST SERIES

**Unit Test-4**

| | | |
|---|---|---|
| **Std: VIII (E.M)** | **Subject: Marathi** | **Time: 2Hrs** |
| **Date :** | **Chapter 11,12,13** | **Max Marks: 41** |

**Q.1** **पुढील उताऱ्याचा आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.** **8**

Q1. आकृतीबंध पूर्ण करा: 2




बाईंनी माझी हॅट माझ्या हातात ठेवल्यावर मी ओळखलं , आता बाहेर, छान उबदार उन्हात जायचंय. ह्या विचारानं मी पुन्हा आनंदानं टुणटुण उड्या मारू लागले.

पाऊलवाटेनं जात आम्ही विहिरीपाशी आलो. इथंही हनीसकल् वेलीच्या जाळ्या होत्या. त्यांच्या फुलांचा सुगंध दरवळत होता. कोणीतरी विहिरीतून पाणी काढत होतं. त्या पाण्याच्या धारेत बाईंनी माझा हात धरून ठेवला. एका हातावरून अजून थंडगार पाण्याचे ओघळ वाहत असतानाच बाईंनी त्याच हातावर बोटांनी शब्द लिहिला w-a-t-e-r. आधी सावकाश, मग झरझर. मी एकदम निश्चल उभी राहिले. माझं सगळं लक्ष बाईंच्या बोटांच्या हालचालींवर एकवटलं होतं. एकाएकी , इतके दिवस आपण काहीतरी विसरून गेलो होतो , याची अस्पष्ट जाणीव झाली. गमावलेली स्मृती परत येण्यातला थरार मी अनुभवला... w-a-t-e-r वॉ...वॉ...आणि भाषेचं कोडं एकदम माझ्यासमोर जसं उलगडलंच. अरेच्या , पाणी म्हणजे आपल्या हातावरून थंडगार , नाचत, उसळत काहीतरी जातं ते ? त्या एका जिवंत , चैतन्यमय शब्दानं माझ्या आत्म्याला जशी जाग आणली. प्रकाश , आशा, आनंदाची उधळण केली , मुक्त केलं. अजूनही तसे ह्या वाटेत बरेच अडथळे होते; पण लौकरच ते दूर होणार होते.

Q2. का ते लिहा: 2

i. विहिरीपाशी होते

ii. पाण्याच्या धारेत धरला

iii. हातावर बोटांनी लिहिले

iv. हातावर लिहिल्यावर अनुभवला

Q3. अ. पुढील वाक्यातील काळ ओळखा: 1

अजूनही तसे ह्या वाटेत बरेच अडथळे होते

ब. पुढील सब्दांतील समास ओळखा: 1

i. थंडगार ii. हालचाली

Q4. स्पर्शाची जाणीव ही प्रत्येकालाच असते पण अंध व्यक्तीला ती जास्त चांगली असते हे सिद्ध करा. 2

**Q.2** **पुढील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.** **8**

प्र. 1. खालील तक्ता पूर्ण करा. (2)

| कवीला जगणे शिकवणारे घटक | या घटकांपासून कवी काय शिकले? |
|---|---|
| सृष्टीचे मंजुळ गाणे | |
| चंद्र, चांदणे | |
| पणती | |
| नदी | |
| पक्षी | |
| सागर | |
| वृक्ष | |

या सृष्टीचे मंजुळ गाणे
जगणे मजला शिकवून गेले,
झिलमिलणारे चंद्र चांदणे
जगणे मजला शिकवून गेले!

भरकटलेल्या जगात नाही
संस्कारांची जाण कुणाला,
तुळशीवरल्या त्या पणतीचे
जळणे मजला शिकवून गेले!

प्रेम काय ते कुणा न ठावे
नदी सागरा जीव का लावे?
स्वैर होऊनी नदीचे पळणे
जगणे मजला शिकवून गेले!

बुलंद तरीही असे हौसले
पिल्लासाठी किती सोसले,
चिवचिवणाऱ्या चोचीमधले
दाणे मजला शिकवून गेले!

सागराची अथांगता अन्
ही वृक्षाची स्थितप्रज्ञता,
दुसऱ्यासाठी घाव सोसणे
जगणे मजला शिकवून गेले!

प्र. 2. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा. (2)

i. स्वैर होऊन नदी का पळते?

ii. भरकटलेल्या जगात कुणाला कशाची जाण नाही.

प्र. 3. ‘बिनभिंतीची इथली शाळा लाखो इथले गुरु’ हा विचार स्पष्ट करा. (2)

प्र. 4. ‘दुसऱ्यासाठी घाव सोसणे’ या विधानातील भाव स्पष्ट करा. (2)

**Q.3 स्थूलवाचन** **3**

नम्रता, अंबर, आलोक, वरद, वनिता, समीर, शर्वरी, शेखर, समिरा, मानसी, माधवी हे शब्द ‘अकारविल्हे’ प्रमाणे लावा.

**Q.4 दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.** **1**

**1)वाक्याचे प्रकार ओळखा**

त्याशिवाय शरीराचं राज्य सुरळीत कसं चालणार?

**2)विरुद्धार्थी शब्द लिहा** **1**

जगणे

**3)समानार्थी शब्द लिहा** **1**

नजर

**4)दिलेल्या शब्दांचे वचन बदला.** **1**

रंग

**5)अचूक शब्द ओळखा.** **1**

आर्किमिडीज, आर्किमिडिज, आर्किमीडिज, आर्केमिडीज

**6)खालील शब्दांचे प्रचलित मराठी अर्थ लिहा.** **1**

लय

**7)खालील शब्दांच्या जाती ओळखा.** **1**

जाड

**Q.5 खालील शब्दांच्या/मुद्दे आधारे कथा तयार करा:** **5**

कुत्रा _____ भटकताना भाकरीचा तुकडा मिळतो _____ पुलावरून जातो _____ नदीच्या पाण्यात प्रतिबिंब_____ दुसरा कुत्रा ______ भुंकतो _____ भाकरीचा तुकडा पाण्यात

**Q.6 पुढील उतारा वाचून त्यावर पाच प्रश्न तयार करा:** **5**

'विज्ञान-शाप की वरदान? हा माणसाला पावलोपावली पडणारा प्रश्न आहे. विज्ञानाने प्राप्त करून दिलेल्या शेकडो सोयी-सुविधा तो उपभोगत असतो आणि त्याच वेळी वैज्ञानिक शोधांतून ओढवणारे जीवघेणे अपघातही तो अनुभवत असतो. मग त्याला पुन:पुन्हा प्रश्न पडतो की , विज्ञान हा माणसाला मिळालेला शाप आहे की वरदान ?'विज्ञान'रूपी ही कामधेनू माणसावर प्रसन्न झाली आणि मानवी जीवनात आमूलाग्र बदल झाला. चाकाचा शोध लागल्यामुळे माणसाच्या जीवनाला गती आली. विज्ञानाच्या साहाय्याने माणसाने आपल्या सर्व प्रकारचे सामर्थ्य वाढवले. सात महासागरांपलीकडे पसरलेले जग जवळ आले. इतकेच नाही, तर माणसाने अंतराळात झेप घेतली,

**Q.7 पुढील विषयावर निबंध लिहा:** **5**

तुमच्या सूत्र संचालनाच्या पहिल्या अनुभवाचे वर्णन करा.

**-------- All the Best --------**